# प्रेस नोट दिनांक १८/१०/२०१७

## ऐन दिवाळीच्या सणात बनावट खवा वापरून मिठाई बनविणाऱ्या हॉटेल व्यवसायीकास गुन्हे शाखा,युनिट-१, पुणे शहरच्या टिमने घेतले ताब्यात

ऐन दिवाळीच्या सणात बनावट खवा वापरून त्याची मिठाई बनवून मोठया प्रमाणात विक्री करणाऱ्या टोळी बाबत गुन्हे शाखा, युनिट १ चे पोलीस उप निरीक्षक हर्षल कदम यांना त्यांचे खास गुप्त बातमी दारामार्फत माहिती मिळाली होती. सदर बातमी वरीष्ठांना कळवून त्याबाबत कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश झालेने युनिट १ चे व.पो.निरी. नितीन भोसले पाटील, अधिकारी व कर्मचारी यांनी वारजे पोलीस स्टेशनच्या हद्दीत यशोदीप चौक, पुरोहीत स्वीट, वारजे, पुणे या मिठाईच्या दुकानात बनावट खव्यापासून मिठाई बनविली जात होती, त्या ठिकाणी रात्री २३:३० वा. अचानक छापा टाकून, सदर बाबत अन्न व औषध प्रशासन विभागाच्या निरीक्षीका श्रीमती गायकवाड यांना सदर ठिकाणी बोलावून घेवून दुकानाची दोन पंचासमक्ष २५० किलो बनावट खवा व मिठाई किं.रु. ३५,०००/- चा माल मिळून आलेने तो जप्त केला आहे. सदर दुकानाचे मालक ओम प्रकाश कीसनाराम चौधरी, रा. यशोदीप चौक, अंकुश भरम यांचे घरी भाडयाने, वारजे माळवाडी, पुणे हा गेली दोन वर्षापासून अशा प्रकारची बनावट मिठाई बनवून ग्राहकांना विक्री करीत असलेचे त्याने सांगीतले आहे. सदर इसमांस पुढील कारवाई कामी अन्न व औषध प्रशासन, पुणे यांचे यांचे ताब्यात मुद्येमालासह देण्यात आलेले आहे.

सदरची कारवाई ही श्री. प्रदीप देशपांडे सो., अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. पंकज डहाणे सो., पोलीस उप-आयुक्त, गुन्हे. श्री सुरेश भोसले सो., सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-१ यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. नितिन भोसले-पाटील, स.पो.निरी. धनंजय कापरे, पोलीस उप-निरीक्षक, दिनेश पाटील, हर्षल कदम, पो.हवा. राजू पवार, प्रकाश लोखंडे, अशोक माने, सचिन जाधव, इम्रान शेख, प्रशांत गायकवाड, मोहन येलपले, सुभाष पिंगळे, स.पो.फौज. राजाराम सुर्वे, विजयसिंग वसावे, रिजवान जिनेडी, श्रीकांत वाघवले, तुषार खडके, मेहबुब मोकाशी, उमेश काटे, गजानन सोनुने, यांनी केली आहे.